

# मेट्रो- ३ मान्सूनसाठी सज्ज !

**मुंबई :** पावसाळ्यात पाणी साचू नये, यासाठी मेट्रो ३ मार्ग बांधत असलेल्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशननेही उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. प्रकल्पस्थळी सुरू असलेली पावसाळा पूर्व कामे लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्जन्य जलवाहिन्या स्वच्छ करणे, त्यातील गाळ काढून टाकणे तसेच कॅच पिट्स बांधणे, अशी कामे सुरू आहेत. पावसाळ्यात वाहतुकीमध्ये अडथळा येऊ नये, याकरता सर्व बाजूंचे दिशादर्शक, वाहतूक चिन्हे यांची नव्याने रंगरंगोटी करण्याचे काम सुरू असून बॅरिकेट्सवर ब्लिंकर्स लावले जाणार आहेत. पादचाऱ्यांकरता उपलब्ध असलेल्या रेलिंगवर रिफ्लेक्टीव्ह स्टिकर्स लावले जातील. विद्युत वाहिन्यांचे ऑडिट केले जाणार आहे. रस्त्यांवरील खड्डे व खराब पॅच ओळखून दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहेत. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी उच्च क्षमतेचे पंप बसवण्यात आले आहेत, असे मेट्रो ३ च्यावतीने संगण्यात असून आपत्कालीन नियंत्रण कक्ष संपर्क क्रमांक (९१३६८०५०६५ आणि ९१ ७५०६७०६४७७) जारी केला आहे.